# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

**व्यवस्थापन प्रतिनिधींची अधिसभेवरील निवडणूक**

**जाहीर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त)[(28(2)(p)] मधील तरतूदीनुसार संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी अधिसभेवर **(Senate)** निवडून द्यावयाचे आहेत. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील नियम क्र. ८ च्या तरतूदीनुसार तयार करण्यात आलेली व्यवस्थापन प्रतिनिधींची तात्पूरती मतदार यादी तसेच त्रुटी असलेल्या अर्जांची यादी (त्रुटींसह) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे. ज्या व्यवस्थापन प्रतिनिधींच्या नावांबाबत चुकीची नोंद असल्यास, नाव वगळले गेले असल्यास अथवा मतदार यादीत अन्य काही दुरुस्ती/आक्षेप असल्यास खाली नमूद केलेल्या पध्दतीने **मंगळवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ ते शनिवार, दिनांक २६ ऑगस्ट, २०१७ रोजी, संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत सादर करण्यात यावेत. तसेच **गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या निवडणुक विभागाकडे संबंधित ऑनलाईन अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

१) एखादा दस्तऐवज Upload केलेला नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज Upload केलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास तो दस्तऐवज Upload करता येईल. अशाप्रकारे Upload केलेल्या दस्तऐवजाची व अर्जाची प्रत काढून (Printout) विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

२) एखाद्या दस्तऐवजाची मूळ/छायाकिंत प्रत मूळ अर्जासोबत सादर केलेली नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज जोडलेला असल्यास विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद करावा व अर्ज अद्ययावत (Update) करावा आणि अशाप्रकारे अद्ययावत (Update) केलेल्या अर्जाची प्रत काढून (Printout) आवश्यक त्या दस्तऐवजांसह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

२१/८/१७

**(डॉ.अरविंद दिगंबर शाळीग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/९८
दिनांक : २१ /०८/२०१७